# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

# दिनांक ०७/१२/२०२० (सोमवार)

---

## १.८२० किलो अंमली पदार्थ (गांज्या) व दुचाकी वाहणासह ३८,८२०/— रु. चा मुद्देमाल जप्त — स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पोलीस ठाणे एमआयडीसी (बुटीबोरी) :— नागपूर (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला यांचे निर्देशानुसार जिल्ह्यात अंमली पदार्थ विरुद्ध विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने दिनांक ०६/१२/२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वरिष्ठांचे आदेशान्वये पोलीस ठाणे एमआयडीसी (बुटीबोरी) परिसरात गस्तीवर असता इसम नामे व्यंकटराव मोहीते, रा. कोपरा ता. सेलु जि. वर्धा हा दुचाकी वाहन क्र. एमएच ३४ जे ४७८४ सुजुकी मॅक्स १०० हिरवट रंगाच्या मोटर सायकलने कान्होलीबारा मार्गे एमआयडीसी बुटीबोरी येथे येणार असुन त्याचे ताब्यातील थैलीत अंमली पदार्थ (गांज्या) असुन गिऱ्हाईकास विक्री करण्याकरीता येणार असल्याबाबत गोपनिय सुत्रांकडुन खात्रीशीर बातमी मिळाली. त्यानुसार सदरची बातमी वरिष्ठांना अवगत करुन मौजा टाकळघाट येथिल कान्होलीबारा रोडवर सापाळा कार्यवाही करीता नाकाबंदी लावण्यात आली. पोलीसांची नाकाबंदी पाहुण व्यंकटराव मोहीते याने आपले दुचाकी वाहण वळवुन पळ काढला. त्याचा पाठलाग केला असता १.८२० किलो अंमली पदार्थ (गांज्या) किंमत १८,२००/— रु. चा आणि आपले दुचाकी वाहण मोक्यावर सोडुन लगतच्या झाडीझुडपात पळुन गेला. सदर अंमली पदार्थ आणि दुचाकी वाहण असा एकुण ३८,८२०/— रु. चा मुद्देमाल मोक्यावरून कायदेशिररित्या हस्तगत करण्यात आले. सदर प्रकरणी व्यंकटराव मोहीते विरुद्ध पोलीस ठाणे एमआयडीसी (बुटीबोरी) येथे अंमली औषधीद्रव्ये व मनःप्रभावी पदार्थ अधिनियम, १९८५ चे कलम २० अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, सहा. पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, पोलीस नाईक रामराव आडे, सुरेश गाते, सत्यशिल कोठारे, पोलीस शिपाई अमृत किनगे, बालाजी साखरे, रोहण डाखोरे,चालक पोलीस हवालदार भाऊराव खंडाते यांनी यशस्वी केली.

## जुगार अड्यावर धाड, ०९ जुगाऱ्यांना अटक – स्थानिक गुन्हे शाखेची कार्यावाही.

पोलीस ठाणे नरखेड :– अंतर्गत दिनांक ०६/१२/२०२० रोजी वरिष्ठांचे आदेशान्वये स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्तीवर असता मौजा खापरी शिवारात काही इसम तास पत्त्यांवर जुगार खेळत असल्याबाबत गोपनिय सुत्रांकडुन विश्वसणीय माहिती मिळाली. त्याअनुषंगाने योजना आखुन मौजा खापरी शिवारात सुरु असलेल्या जुगार अड्यावर सदर पथकाने धाड टाकुण मोठ्या शिताफीने ०९ जुगारी इसमांना ताब्यात घेतले. त्यांचे कडुन नगदी १८,४००/– रु. व जुगार खेळण्याचे साहित्य हस्तगत करून त्यांचेविरूद्ध पोलीस ठाणे नरखेड येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री अनिल जिट्टावार, पोलीस हवालदार राजेंद्र सनोडिया, पोलीस नाईक किशोर धवड, पोलीस शिपाई अजिज दुधकनोज, चालक पोलीस नाईक अमोल कुथे यांनी यशस्वी केली.


CS Scanned with CamScanner

पोलीस ठाणे नरखेड जुगार कार्यवाहीचे छायाचित्र

## चोरी

पोलीस ठाणे सावनेर :– अंतर्गत दिनांक २८/११/२०२० चे ०१.३० वा. ते ०१/१२/२०२० चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी चंद्रभान गणपत सोनवाने, वय ३२ वर्षे, रा. तिष्टी, ता. कळमेश्वर यांनी आपली फॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ४०/एजे १८६४ किंमत १०,०००/७ रु. ची राजकमल चौक, सावनेर येथे उभी करुन किराणा सामान घेण्याकरीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने त्यांची मोटार सायकल चोरुन नेली. सदर प्रकरणी अज्ञात आरोपी विरूद्ध पोलीस ठाणे सावनेर येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक श्री प्रकाश नांदुरकर हे करीत असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

पोलीस ठाणे केळवद :— अंतर्गत दिनांक ०५/१२/२०२० चे १३.३० वा. दरम्यान फिर्यादी विठोबा शामराव महाजन, रा. केळवद हे शिवलॉन येथे कार्यक्रमानिमित्त गेले असता लॉन बाहेरुन त्यांची होन्डा स्प्लेंडर मोटार सायकल क्र. एमएच ४०/एएस ६८१९ किंमत १०,०००/— रु. ची कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरुन नेली. फिर्यादी यांचे तक्रारीवरुन अज्ञात आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे केळवद येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री राठोड हे करीत असुन आरोपीचा शोध सुरु आहे.

पोलीस ठाणे उमरेड :— अंतर्गत दिनांक ०६/१२/२०२० रोजी १७.३० वा. दरम्यान मौजा नवेगाव साधु शिवारात अशोक लेलॅन्ड टिप्पर क्र. एमएच ४०/बीजी ८३३५ चा चालक दिनेश किसन खोकले, वय ३५ वर्षे, रा. पोलार, ता. नागपूर हा आपले टिप्परमध्ये ०६ ब्रास रेती किंमत ३०,०००/— रू. ची अवैधरित्या विनापरवाना घेवुन जातांना मिळुन आला. सदर प्रकरणी टिप्पर चालकाकडुन रेती व टिप्परसह एकुण १५,३०,०००/— रू. चा मुद्देमाल हस्तगत करुन त्याचेविद्ध पोलीस ठाणे उमरेड येथे कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सहा. पोलीस उपनिरीक्षक श्री धुर्वे हे करीत आहेत.

## अल्पवयीन मुलीचा विनयभंग

पोलीस ठाणे बेला :— अंतर्गत दिनांक ०५/१२/२०२० रोजी २१.०० वा. दरम्यान फिर्यादी महिलेची ०७ वर्षीय अल्पवयीन मुलीस प्रकाश उर्फ कदु सुर्यभान बावणे, रा. बेला याने बिस्कीटचे आमिष दाखवुन तिला आपले सोबत नेले आणि तिच्यासोबत अश्लील चाळे करुन विनयभंग केला. सदर प्रकरणी प्रकाश उर्फ कदु सुर्यभान बावणे याचे विरूद्ध पोलीस ठाणे बेला येथे कलम ३५४ (अ) भादंवि सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद करुन त्यास अटक करण्यात आली आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्रीमती आरती उघडे, पोलीस ठाणे बुटीबोरी या करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

१) पोलीस ठाणे कनहान :— अंतर्गत दिनांक दिनांक ०६/१२/२०२० रोजी १६.४५. वा. ते १७.०० वा. दरम्यान मौजा गोंडेगाव कोलवासरी शिवारात धनराज गुलाबराव कुभलकर, रा. गोंडेगाव हे त्यांची मोटार सायकलने डबल सिट शेतातुन घरी परत जात असतांना कोळशाने भरून असलेल्या ट्रक क्र. एमएच ४०/वाय ८२१२ च्या चालकाने आपला ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन त्यांचे मोटार सायकलला धडक मारुन पळुन गेला. सदर अपघातात धनराज गुलाबराव कुभलकर हे गंभीर जखमी होवुन जागीच मरण पावले आणि त्यांचे दुचाकीवर बसलेले गोंविंदा दांडे हे गंभीर जखमी झाले. सदर प्रकरणी चंद्रकांत गुलाबराव कुंभलकर, वय ३७ वर्ष, रा. गांधी चौक, गोंडेगाव यांचे तक्रारीवरून ट्रक चालकाविरूद्ध पोलीस ठाणे कन्हान येथे कलम २७९, ३३८, ३०४(अ) भादंवी सहकलम १८४, १३४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात

आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री अरूण सहारे हे करीत असुन ट्रक चालकाचा शोध सुरू आहे.